पोलीस दैनिक गुन्हे वार्तापत्र
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
दिनांक 17/01/2020 (शुक्रवार)
(सकाळ)

---

## रेती चोरी करणाऱ्या आरोपीतांना अटक

पो.स्टे. पारशिवनी :– अंतर्गत 13 किमी अंतरावर मौजा नवेगाव शिवार पेंच डूम येथे दिनांक 16/01/2020 चे 05.44 वा. एमच–34/एल–8905 क्रमांकाचा ट्रॅक्टर व एमच–40/बीजे–3380 क्रमांकाची ट्रॉलीचा चालक आरोपी नामे– क्र. 1) सागर किसनराव राऊत, वय 33 वर्ष, रा. कोंडासावळी व एमच–27/डी–6469 क्रमांकाचा ट्रॅक्टर व एमच–27/एफ–6759 क्रमांकाची ट्रॉली चा चालक आरोपी नामे– क्र. 2) गणेश बाबुलाल सोनटक्के, वय 27 वर्ष, रा. बच्छेरा या दोन्ही आरोपीतांनी त्यांच्या ताब्यातील वाहनात मौजा नवेगाव शिवारातील पेंच नदीच्या पात्रातुन विनापरवाना अवैधरित्या प्रत्येकी 1 ब्रास रेती किं. 6,000/– रू. रेती भरून वाहतुक करतांना मिळुन आले. वाहनासह एकुण 7,06,000/–रुपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे.

सदर प्रकरणी सर तर्फे पोलिस नाईक हेमंत रंगारी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. पारश्विनी येथे आरोपीविरुध्द कलम 379 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीतांना अटक आहे. गुन्हयाचा पुढील तपास सपोनि श्री पळणाटे 7387086178 हे करीत आहे.




<u>दुखापत</u>

पो.स्टे. रामटेक :– अंतर्गत मौजा साटक येथे दिनांक 22/12/2019 चे 19:45 वा. ते 20:46 वा. दरम्यान फिर्यादी नामे– राजु ताराचंद वाडीभस्मे, वय 45 वर्ष, रा. साटक व आरोपी 1) राजु आकरे हे एकाच गावातील रहीवासी आहेत. फिर्यादी हे आपले अंडयाचे दुकानात अंडे विक्री करीत होते. दरम्यान आरोपी हे फिर्यादीचे दुकानात आले व फिर्यादीला उकडलेले अंडे विकत मागत होते फिर्यादीने माझे दुकानात तेवढे अंडे नाहीत फक्त 6 अंडे शिल्लक आहेत व ते ग्राहकांना दयायचे आहे असे म्हटले. यानंतर आरोपी नामे– 1) राजु आकरे, 2) संतोश आकरे व 3) रामर कुभंलकर सर्व रा. साटक यांनी संगनमत करून फिर्यादीस शिवीगाळ केली. यानंतर आरोपी राजु आकरे याने फिर्यादीचे हातावर बासाच्या काठीने मारहाण करून फिर्यादीला जखमी केले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरून पो.स्टे. रामटेक येथे आरोपीतांविरुध्द कलम 325, 504, 34 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. यातील आरोपीतांचा शोध घेणे सुरू आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार रावते 9420409454 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर